REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २४ एप्रिल, १९४० अंक १७

" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

मुंबई प्रान्ताच्या शाळाखात्यानें लायब्ररीसाठी मंजूर केलेलें व असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांनीं शिफारस केलेलें पुस्तक.

फर्म, कंपनी, सोसायटीचा कायदा

( लेखकः—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए. ऑनर्स, )
एलएल. बी. वकील.

या पुस्तकांतील कायद्यासंबंधीं विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला धरून आहे. तिकिटरूपानें ८६ पाठवून एक प्रत संग्रही ठेवा.

तसेंच शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी मुंबई सरकारनें नवीनच पास केलेला

— शेतकरी ऋणविमोचन कायदा —

मराठी भाषेंत छापत आहे. १ रु. पाठवून नांव नोंदवा. मागाहून किंमत जास्त पडेल. तरी आजच ऑर्डर द्या.

पत्ता मॅनेजर, सेन्ट्रल लॉ हाऊस.
टिळक रोड, नागपूर शहर.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए., कँटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

# विविध माहिती

### पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट

ब्रिटिश हिंदुस्थानांत चालू असलेल्या वरील कायद्यांत थोडी दुरुस्ती करून बडोदें सरकारनें तो आपल्या संस्थानांत लागू केला आहे. १० तारखेच्या आंत मागील महिन्याची मजुरी कामगारांस मिळाली पाहिजे व दंडाची रकम त्यांस मिळावयाच्या मजुरीच्या रुपयास एक आणा ह्यापेक्षा अधिक असतां कामा नये अशी त्यांत तरतूद आहे.

### मासिकांचा खप

अमेरिकेंत मासिकाच्या सुमारें ८ कोटि प्रती दरसाल खपतात.

### बावीसशें कोटि पत्रांचा बटवडा

ग्रेटब्रिटनमध्यें दरवर्षी २,२०० कोटि आलेल्या व गेलेल्या पत्रांचा बटवडा ब्रिटिश पोस्टऑफिसामार्फत होतो. दररोज दर माणशीं सुमारें आलेलें व गेलेलें एक पत्र ह्यापेक्षां कमी असें सरासरीचें हें प्रमाण बसतें.

### नॉर्वेचा १,२०० मैल लांबीचा किनारा

नॉर्वेच्या समुद्रकिनाऱ्याची लांबी १,२०० मैल आहे आणि त्याच्या लगत दीड लक्ष लहानसहान खडकाळ बेटें आहेत.

### बटन

ग्रेटब्रिटनमध्यें प्रतिवर्षी तीनशें कोटि बटनांचा खप होतो. जगांतलें सर्वांत मोठें बटनांचें उत्पादन इटलीमध्यें होतें. तेथें दररोज सत्तर लक्ष बटन तयार होतात आणि त्या धंद्यांत दहा हजार माणसें कामावर आहेत.

### डॅनिश व नॉर्वेजिअन बँकांतलें सोनें

डेन्मार्क व नॉर्वे ह्या देशांवर जर्मनीची स्वारी होण्यापूर्वी त्यांमधील मध्यवर्ती बँकांत अनुक्रमें करून १७ कोटि रुपये आणि २४ कोटि रुपये इतक्या किंमतीचें सोनें होतें. त्यावर जर्मनीनें झडप घातली आहे कीं काय आणि त्यापैकीं जर्मनीच्या हातांस किती सोनें लागलें आहे, हें अजून समजलें नाहीं.

### युद्धनिधीस हिंदी संस्थानांचें सहाय

युद्धनिधीस हिंदी संस्थानिकांनीं द्रव्यसहाय दिलें आहे, त्याचा आकडा आतां एक कोटि रुपये झाला आहे. ह्या रकमेपैकीं सुमारें चाळीस लक्ष रुपये पहिल्या हप्त्याच्या स्वरूपाचे आहेत. विशिष्ट प्रकारच्या ऐनजिनसी देणग्या देण्यांत आल्या आहेत, त्या निराळ्याच आहेत.

### हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें व एक्साइजचें उत्पन्न

एप्रिल १९३९ ते मार्च १९४० अखेरच्या वर्षांत हिंदुस्थान सरकारास कस्टम्स व एक्साइजचें एकूण उत्पन्न ५७ कोटि, २९ लक्ष रुपये इतकें मिळालें. पूर्वीच्या वर्षापेक्षा सुमारें ४ कोटि रुपयांनीं हा आकडा मोठा आहे.

### जर्मनी-लिथ्युएनिया व्यापारी करार

जर्मनीनें लिथ्युएनियाशीं एक व्यापारी करार नुकताच केला आहे. त्याअन्वयें लिथ्युएनियाचा बराचसा परराष्ट्रीय व्यापार आपल्या कक्षेंत आणण्याची योजना जर्मनीनें केली आहे.

### गुळापासून साखर

गुळापासून साखर करणारे दहा कारखाने हिंदुस्थानांत आहेत. त्यांमध्यें जानेवारी ते डिसेंबर ह्या बारा महिन्यांत चालू सालीं २१,८०० टन साखर होईल असा अंदाज आहे. गेल्या सालचा तत्सम आकडा १४,९०० टन असा होता.

### ब्रिटिश तिजोरीचा खर्च

गेल्या ३१ मार्चला पुऱ्या झालेल्या वर्षांत ब्रिटिश सरकारचा एकूण खर्च सुमारें २४२० कोटि रुपये झाला. ह्यांतील सुमारें ६५० कोटि रुपये कर्ज काढून उभे केलेले आहेत.

### डॉक्टर

आधुनिक वैद्यकीय पद्धतीनें शिकून तयार झालेल्या डॉक्टरांची संख्या हिंदुस्थानांत ९० हजार आहे.

### ग्रामपंचायती

मुंबई प्रांतांतील ग्रामपंचायती संबंधांतल्या दुरुस्त कायद्यास अनुसरून पंचायतींची पुनर्घटना करण्याचें प्रांतिक सरकारनें ठरवलें आहे. दोन हजार वस्तीच्या सर्व गांवांत नोव्हेंबरपासून ग्रामपंचायती स्थापन होतील, त्यांचीं नांवें निश्चित झालीं आहेत. नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेपासून सध्याच्या सॅनिटरी कमिट्या बंद होतील.

### मागसलेल्या जातींकरितां शिष्यवृत्त्या

यांत्रिक शिक्षणासाठीं मागसलेल्या 'जातींच्या' मुलांकरितां चार वर्षें मुदतीच्या दहा शिष्यवृत्त्या मुंबई सरकारनें निश्चित केल्या आहेत.

### फ्रेंच साम्राज्याचा व्याप

फ्रेंच साम्राज्याचें क्षेत्रफळ ४५ लक्ष चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ६३ कोटि आहे.

### विजेच्या तारांचें जाळें

विजेच्या शक्तीनें संदेश पाठवण्याच्या तारांचें जाळें हिंदुस्थानभर पसरलें असून त्याची एकूण लांबी पांच लक्ष मैलांचेपेक्षा अधिक आहे. एवढ्या लांबीची तार पृथ्वी व चंद्र ह्यांचेमधील अंतर दोनदां तोडून शिल्लक राहील.

### ब्रिटिश मालकीचे अमेरिकन रोखे

ब्रिटिश नागरिकांच्या मालकीचे अमेरिकेंतील सरकारी, निमसरकारी व औद्योगिक रोखे सुमारें १,००० कोटि रुपये किंमतीचे आहेत. म्हणजे इतका पैसा ब्रिटिश लोकांनीं अमेरिकेंत गुंतवला असून त्यावर व्याज व नफा त्यांस मिळतो.

### हिंदुस्थानांतील रेडिओ

हिंदुस्थानांतील रेडिओचे कार्यक्रम अधिक आकर्षक व बोधप्रद होण्यासाठीं कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत ह्या संबंधांत दिल्ली येथें निरनिराळ्या केंद्रांच्या मुख्य अधिकाऱ्यांची एक परिषद् कंट्रोलर, मि. बुखारी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती आणि तीमध्यें विविध प्रकारांच्या सुधारणा हातीं घेण्याचें ठरलें.

### विजेच्या शक्तीनें चालणाऱ्या गिरण्या

मुंबईतल्या ६५ कापडाच्या गिरण्यांपैकीं ४५ गिरण्या पाण्याच्या जोरावर उत्पन्न केलेल्या विजेच्या शक्तीनें चालतात. ही वीज कोळशापासून निर्माण झालेल्या शक्तीपेक्षा स्वस्त पडते.

### ब्रिटिश रेल्वेजचे दर वाढणार

ब्रिटिश रेल्वेजच्या सर्व दरांत १० टक्के वाढ मे महिन्याच्या प्रारंभापासून होणार आहे.

### इंजिनांचें वजन

हिंदुस्थानांतील आगगाड्यांच्या इंजिनांचें कमाल वजन २०२ टन असतें. अमेरिकेंतील कांहीं इंजिनांचें वजन ४५५ टन आहे.

### हिंदुस्थानांतील रेल्वे रुळांचें वजन

| | प्रत्येक यार्ड रुळाचें वजन ( पौंड ) |
|---|---|
| एन. डब्ल्यू. आर. | ९० |
| जी. आय. पी. रेल्वे | १०० |
| ई. इ. रेल्वे | ११५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १९४ |
| २ प्रांतिक उद्योगधंद्यांची उन्नति ... ... | १९५ |
| ३ जपानी चित्रपटांचा धंदा | १९६ |
| ४ रेशीम–जपान व म्हैसूर | १९६ |
| ५ स्फुट विचार ... | १९७ |
| जपानी कापडाचा हिंदुस्थानांत वाढती आयात–इंग्लिश लोकांच्या मालकीचे अमेरिकन रोखे–युद्धाच्या हालचाली—ब्रिटिश पार्लमेंट आणि हिंदुस्थान–लोकहिताच्या योजनांची अंमलबजावणी–ब्रिटिश कापडावरील जकात कमी झाली– | |
| ६ इजिप्तमधील शेतकऱ्यांचें कर्जनिवारण ... | १९९ |
| ७ ग्रामसुधारणेचा प्रयत्न | २०० |
| ८ "हिमालय" ... | २०८ |
| ९ मेहेकर को. लँड मॉ. बँक | २०२ |
| १० राष्ट्रसंघाचें कार्य | २०२ |
| ११ निवडक बाजारभाव | २०३ |


अर्थ

बुधवार, ता. २४ एप्रिल, १९४०

## प्रांतिक उद्योगधंद्यांची उन्नति

### सर पुरुषोत्तमदास कमिटीचा रिपोर्ट

मुंबई सरकारनें, कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ असतांना, ह्या प्रांताच्या आर्थिक व औद्योगिक परिस्थितीची पहाणी करून तींत आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा घडवून आणण्यासाठी विधायक सूचना कराव्या ह्या हेतूनें सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी दोन वर्षांमागें नेमली होती. तिचा रिपोर्ट आतां सरकारला सादर करण्यांत आला आहे. त्यांतील प्रमुख सूचनांचा त्रोटक परामर्श येथें घेण्याचें योजलें आहे. खेडेगावांतील जनतेची आर्थिक अवस्था अलीकडे अत्यंत शोचनीय झाल्याची जाणीव आतां सर्वांसच झाली आहे. ह्या लोकांची उपजीविका कष्टमय होण्याचें कारण त्यांची मिळकत अपुरी आहे हें होय आणि त्यांस जोडधंदे उपलब्ध झाल्यावांचून तींत भर पडूं शकत नाहीं ही गोष्टहि तितकीच स्पष्ट झालेली आहे. खेडेगावांच्या दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रमुख उपाय म्हणून दुय्यम व्यवसायांची सोय होणें अगत्याचें असल्याचें सर पुरुषोत्तमदास कमिटीनें नमूद केलें आहे. शेतकरीवर्गाचा पुष्कळ वेळ बेकारींत जातो, त्याचा उपयोग व्हावा ह्या हेतूनें दुय्यम धंदे संघटित करण्याचें काम औद्योगिक खात्याच्या एका अधिकाऱ्याकडे सोपवण्यांत यावें असें कमिटीचें म्हणणें आहे. खादीच्या व्यवसायाचें खेडेगावी जीवनांत जिव्हाळ्याचें महत्त्व असल्यानें खादीच्या प्रत्येक वारास एक आणा ह्याप्रमाणें सरकारनें उत्तेजनार्थ द्रव्यसहाय द्यावें अशीहि तिची सूचना आहे. खेडेगावांत लहान आणि मध्यम दर्जाचे कोणते व्यवसाय चालवतां येतील ह्याची चौकशी करण्यासाठी एक संशोधनसंस्था सबंध प्रांताकरितां स्थापण्यांत यावी असें तिनें पुढें सुचवलें आहे. खेडेगावी धंद्यांचा प्रश्न पद्धतशीर रीतीनें आणि सरकारच्या आश्रयानेंच सोडवला गेला पाहिजे अशी कमिटीची भूमिका आहे. ह्याहि पुढें जाऊन कमिटीनें असें प्रतिपादलें आहे कीं, ह्या प्रश्नाचा अखिल भारतीय व्याप लक्षांत घेतां त्याचा विचार करण्यासाठी प्रांतिक सरकार व संस्थानें ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद् भरवण्यांत यावी. हिंदुस्थानची आर्थिक उन्नति होण्यास लहान आकाराच्या व खेडेगावी व्यवसायांची जोपासना आणि उन्नत्ति अगत्याची आहे हें मत कमिटीच्या रिपोर्टांत व्यक्त झालें आहे.

हिंदुस्थानच्या आर्थिक घटनेंत लहान प्रमाणावरील आणि मोठ्या व प्रचंड आकाराचे धंदे ह्यांचा समावेश होऊन मेळ बसवला जाणें आवश्यक आहे. त्यांच्या प्रगतीचे बाबतींत हितसंबंधांचा, स्थानिक, प्रांतिक इत्यादि स्वरूपाचा विरोध उत्पन्न होऊन चालावयाचें नाहीं. जिल्हानिहाय खेडेगावी उद्योग स्थापून त्यांस कच्चा माल पुरवणें आणि त्यांच्या पक्क्या मालाचा खप करणें ह्या गोष्टी सरकारनें त्यांचे संघांचे विद्यमानें करवून घ्याव्या असें कमिटीचें मत आहे. खेडेगावी धंद्यांच्या मालास उत्तेजन देण्यासाठी तो सरकारनें झीज सोसूनहि विकत घेऊन वापरावा आणि तसें करण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांस सांगावें असें कमिटीचें म्हणणें आहे. कापड विणण्याच्या विजेच्या वगैरे शक्तीनें चालणाऱ्या मध्यम आकाराच्या कारखान्यांचा विस्तार होणें श्रेयस्कर नाहीं असें कमिटीचें मत आहे, तें लक्षांत घेण्यासारखें असून हातसुताचा उपयोग विणण्याच्या धंद्यांत होणें अगत्याचें आहे हें कारण तिनें ह्या आपल्या अभिप्रायाचे पुष्ट्यर्थ दिलें आहे. हातसुतास व खादीस उत्तेजन देण्याची शिफारस स्वतंत्र रीतीनें केल्यावर मध्यम आकाराचे कापड विणण्याचे कारखाने चालण्यास कमिटीनें विरोध करण्यांत स्वारस्य दिसत नाहीं. लहान धंद्यांस भांडवल पुरवण्याकरितां सरकारनें पंचवीस लक्ष रुपयांची एक औद्योगिक बँक स्थापन करावी अशीहि कमिटीची सूचना आहे. ही बँक आपलें काम कसें करणार आणि आज प्रांतिक सरकार लहान धंद्यांस विशिष्ट अटींवर पैसा पुरवतें, त्या व्यवस्थेची ती जागा घेणार कीं काय ह्याचा विचार होणें इष्ट आहे.

उद्योगधंद्यांसंबंधाची माहिती गोळा करून ती लोकांच्या उपयोगासाठी वेळोवेळ प्रसिद्ध करावी ह्यासाठी औद्योगिक खात्याच्या एका अधिकाऱ्यास हें काम सांगावें आणि सर्व धंदेवाल्यांस ह्या प्रकारची माहिती पुरवण्याची सक्ती करावी अशी कमिटीची शिफारस आहे. उद्योगधंदे चालवणाऱ्या लोकांस शास्त्रीय सल्ला मिळावा म्हणून सरकारनें एक संशोधन संस्था मुंबईंत चालवावी आणि धंदेवाल्या मंडळीस ह्या कार्यासाठी पैशाची मदतहि करावी असें कमिटीनें सुचवलें आहे. प्रांतांत उद्योगधंद्यांची प्रादेशिक वांटणी योग्य रीतीनें होऊन त्यांमध्यें अनिष्ट स्पर्धा होणार नाहीं आणि प्रतिकूल परिस्थितींत धंद्यांचा विस्तार होऊं नये, एवढ्यासाठी धंदे काढणारांस व वाढवणारांस सरकारी परवाना मिळवण्याची अट असावी अशी सूचना कमिटीनें केली आहे. ती कितपत व्यवहार्य आहे. ह्याची शंका आहे. वहातुकीच्या सौकर्यासाठी रस्त्यांचा विस्तार, प्रौढ शिक्षणाची वाढ आणि लोकांच्या आरोग्यांत सुधारणा ह्या गोष्टी झाल्यावांचून औद्योगिक उन्नतीचे प्रयत्न निष्फळ होण्याची भीति कमिटीनें प्रकट केली आहे. उद्योगधंद्यांच्या उन्नतीचे मार्गानें मुंबई प्रांतांतील जनतेची उन्नति होण्यास कोणत्या विस्तृत प्रमाणांत व तपशीलवार रीतीनें कमिटीच्या मतें सरकारनें प्रयत्न केले पाहिजेत ह्याची कल्पना तिच्या सुचनांचा मथितार्थ वर दिला आहे, त्यावरून ध्यानांत येईल. खेडेगावी आणि छोटेखानी धंद्यांच्या व व्यवसायांचा प्रश्न येथें प्रमुख असल्याकारणानें त्यांच्या संघटनाचे बाबतींत सरकारनें पुढाकार घेण्याचें विशेष महत्त्व आहे, हें येथें लक्षांत बाळगणें आवश्यक

आहे. हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार ह्यांचीं आर्थिक धोरणें आणि त्यांनीं बसवलेले कर ह्यांचा आणि लहानमोठ्या धंद्यांच्या हितसंबंधांचा योग्य मेळ घातला गेल्यावांचूनहि फारशी कार्य-निष्पत्ति होणार नाहीं हें येथें विसरून चालणार नाहीं. प्रांतांच्या औद्योगिक परिस्थितीची यथातथ्य कल्पना येण्यास सर पुरुषोत्तमदास कमिटीच्या रिपोर्टाचा उपयोग होऊन त्याचे योगानें विचारास व कृतीस चालना मिळेल ह्यांत संशय नाहीं.

---

## जपानी चित्रपटांचा धंदा

जपाननें हॉलिवुडच्या धर्तीवर चित्रपटांचा धंदा मोठ्या प्रमाणावर थाटला आहे, पण त्यांत स्वतःचें वैशिष्ट्य राखलें आहे. ह्या जपानी धंद्यांत सुमारें १२ कोटि रुपयांचें भांडवल गुंतलें आहे. जपानमध्यें दोन हजार सिनेमागृहें आहेत आणि चालू सालीं त्यांमध्यें प्रेक्षक वीस कोटि वेळां चित्रपट पहाण्यास जातील असा अंदाज आहे. जपानी चित्रपटशाळांमध्यें (स्टूडिओज) वातावरण साधेपणाच्या वृत्तीचें असतें आणि हॉलिवुडप्रमाणें त्यांत कृत्रिमपणा नसतो. प्रसिद्ध नट व नटी स्टूडिओमधील कामगारांमध्यें मोकळेपणानें मिसळतात. विनोदी चित्रपट जपानमध्यें फार लोकप्रिय आहेत, तथापि त्यांपैकीं अनेकांत जपानी राष्ट्रीय जीवित चित्रित केलेलें असतें. चीनमधील जपानी राजकारणाशीं त्यांपैकीं कित्येकांचा संबंध आलेला आहे. आजच्या सामाजिक जीवनाविषयींच्या प्रश्नांवर आधारलेले चित्रपट बरेच असतात, आणि त्यांत जुन्या-नव्या विचारांचा झगडा प्रतिबिंबित केलेला आढळतो. जपानी चित्रपट सामान्यतः विशेष खर्चाचे नसतात; त्यांवर होणाऱ्या खर्चानें हॉलिवुडमधील डायरेक्टरांच्या वीरचें बिलहि भागावयाचें नाहीं! जपानी चित्रपटाच्या खर्चाचें अंदाजपत्रक सरासरीनें लाख दीड-लाख रुपयांच्या पलीकडे जात नाहीं. खर्च मर्यादित ठेवावयाचा आणि प्रेक्षकांच्या आवडीस मान द्यावयाचा ह्या दुहेरी हेतूनें चित्रपटांचीं कथानकें जपानच्या भौगोलिक कक्षेच्या बाहेर जाऊं दिलीं जात नाहींत. हॉलिवुडच्या नमुनेदार चित्रपटांतल्या नायिकेच्या प्रेमाचें क्षेत्र न्यूयॉर्क शहर असतें आणि ती आपल्या प्रेमपात्राशीं विवाह पॅरिसमध्यें होऊन ती दक्षिण आफ्रिकेंतील शेतीवाडीवर रहाण्यास जाते आणि अखेरीस होनोलूलूमध्यें आजीबाई म्हणून दिवस कंठते. जपानी चित्रपटांत असल्या दृश्यांची मजल मँचूकूओच्या पलीकडे जात नाही. जपानी चित्रपटतज्ञांच्या मतें त्यांच्या देशांत चित्रीकरणाच्या विविधतेस भरपूर वाव आहे. जपानी नाविक योद्ध्यांच्या चिनी सैन्याशीं झालेल्या युद्धप्रसंगांतील पराक्रमाचें चित्रीकरण जापांच मरीन्स ह्या बोलपटांत प्रत्यक्ष लढाईच्या स्थळावर सरकारच्या सहायानें करण्यांत आलें आहे आणि त्याचा खर्च १५ लक्षांवर झाला असें म्हणतात. टोहो कंपनीचा टोकियो स्टूडिओ प्रचंड असून त्यांत एक हजार माणसें कामावर आहेत आणि कचेरींत आणखी एक हजार नोकर कामावर आहेत ते वेगळे. हॉलिवुडच्या धर्तीवर जपानी चित्रपटांचा धंदा विस्तार पावत आहे.

---

## रेशीम—जपान व म्हैसूर

रेयॉनसारख्या कृत्रिम धाग्याचा कापड करण्याकडे अधिकाधिक उपयोग होत असला तरी नैसर्गिक रेशमाचें स्थान, त्याच्या विशिष्ट गुणांमुळें, अजून अढळ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून रेशीम वापरण्यांत येत असून त्यास लौकिक मान्यता प्राप्त झाली आहे. तथापि, काश्मीर, बहार, आसाम, बंगाल व अलीकडे म्हैसूर ह्या भागांतच रेशमाचा धंदा मर्यादित प्रमाणावर चाललेला आहे. जपाननें रेशमाच्या धंद्याचें संघटन व प्रगति हीं विलक्षण रीतीनें घडवून आणलेली आहेत. जगांतील रेशमाच्या एकूण पुरवठ्यापैकी तीन चतुर्थांशावर हिस्सा जपानी रेशमाचा आहे. चीन, इटली व फ्रान्स ह्या देशांची प्रत रेशमाच्या उत्पादनाचे बाबतींत जपानच्या खालीं लागते. जपानी रेशमाच्या चार-पांच लक्ष गाठी दरवर्षी परदेशांत जातात आणि त्यांचें सर्वांत मोठें गिऱ्हाइक अमेरिका हें आहे.

जपानी रेशमास १९३९ हें साल मोठ्या तेजीचें गेलें. पूर्वीच्या बारा वर्षांत रेशमास ह्या साला इतका चढीचा भाव कधीच आला नव्हता. दर गाठीस दोन हजार येन इतकी किंमत येऊन पन्नास कोटि येन किंमतीचें जपानी रेशीम १९३९ मध्यें परदेशीं गेलें. जपानी निर्गत व्यापारांत कापसाच्या मालास पहिल्या प्रतीचें स्थान होतें तें रेशमानें पटकावलें. ह्या सालीं रेशमाच्या कोशांचें (ककून्स) जपानचें उत्पादनहि मागच्या चाळीस वर्षांत कधी झालें नव्हतें इतकें आणि त्याची किंमत ८८ कोटि येन होती. जपानी रेशमास गेल्या सालीं आलेली विलक्षण तेजी फार काळपर्यंत टिकणें शक्य नाहीं ह्याची जाणीव त्याच्या धंद्यांतील लोकांस आहे. रेशमाच्या वाढलेल्या किंमतीचा प्रतिकूल परिणाम त्याच्या निर्गतीवर झाल्यावांचून रहाणार नाहीं हें उघड आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन जपानी सरकारनें रेशमाच्या स्थानिक किंमतींचें नियंत्रण करून त्या निश्चित केल्या आहेत. जपानमध्यें रेशमाच्या धंद्याची सुस्थिति टिकवून तीमध्यें सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सरकारच्या सहायानें पद्धतशीर रीतीनें चालले आहेत, हें सुप्रसिद्ध आहे. म्हैसूर संस्थाननें असेंच धोरण स्वीकारलें असून रेशमाच्या धंद्याची जोपासना व संघटन हीं हातीं घेतलीं आहेत, ही गोष्ट अभिनंदनीय आहे. रेशमाचे किडे व कोशे करण्यासाठी खेडेगांवांतून शेतकऱ्यांस उत्तेजन देण्यांत येत आहे आणि शास्त्रीय संशोधनाचें कार्य म्हैसूर सरकार तज्ञांकरवीं करून घेत आहे.

---

## अमेरिकेंत आहाराविषयीं शास्त्रीय संशोधन

अमेरिकेंतील राष्ट्रांच्या आहारासंबंधीं संशोधन करण्याचें काम राष्ट्रसंघानें अंगावर घेतलें असून आतापर्यंत अर्जेंटाइन, बोलीव्हिया, ब्रेझिल, चिली, कोलंबिया, क्युबा, इक्वेडर, डोमीनीकन रिपब्लिक, ग्वाटामाला, हैटी, हाँडुरास, पॅराग्वे, मेक्सिको, पेरु, उराग्वे व व्हेनेझुएला या राष्ट्रांतील आहार-विषयक सवयींचें संशोधन करण्यांत आलें आहे. प्रत्येक राष्ट्रांत या विषयाच्या अभ्यासास चालना देणारी एक समिति नेमणें व त्या समितीकडे आहाराव्यतिरिक्त अर्थशास्त्र, सामाजिक चालीरीती, मजुरांची स्थिति या विषयांचाहि अभ्यास करून घेणें, विश्वविद्यालयांतून आहार विषयाला प्राधान्य मिळविणें, डॉक्टरांचें व समाज-सेवकांचें सहकार्य साधणें व या कामाचा सतत पिच्छा पुरवणारी मंडळी निर्माण करणें असा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे.

## स्फुट विचार

### जपानी कापडाची हिंदुस्थानांत वाढती आयात

हिंद-जपान व्यापारी करारांत जपाननें घ्यावयाचा हिंदी कापूस आणि ह्या देशांत येऊं द्यावयाचें जपानी कापड ह्या संबंधानेंच मुख्य अटी असतात. हिंदी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें आमच्या कापसास जपानमध्यें मोठें गिऱ्हाइक मिळणें अगत्याचें आहे. म्हणून जपानचें कापड हिंदी गिरण्यांशीं स्पर्धा करून इकडे यावयाचें असेल तर त्याच्या मोबदल्यांत जपाननें ठराविक प्रमाणांत इकडचा कापूस घेणें आवश्यक आहे. हिंदी कपास कमी प्रमाणांत घेऊन अधिक कापड हिंदुस्थानांत खपवण्याची खटपट जपान करणार हें त्या राष्ट्राच्या धंदेवाईक स्वभावास व धोरणास अनुसरूनच आहे. ह्याकरितां हिंदी सरकार व जनता ह्यांनीं जागरूक राहून जपाननें योग्य प्रमाणांत हिंदी कापूस घेण्याची अट पुरी करावी ह्या विषयीं खबरदारी घेतली पाहिजे. ह्या बाबतींत कराराचें नुसतें शाब्दिक पालन होऊन चालावयाचें नाहीं. त्याच्या मुळाशीं असलेला मुख्य हेतु साध्य झाला पाहिजे. अलीकडे विशिष्ट जातीचें कापड चीन मधून वाढत्या प्रमाणांत ह्या देशांत येत आहे, पण तें वस्तुत: जपानच्या हुकमतीखाली असलेल्या चिनी गिरण्यांतलें आहे आणि म्हणून त्याचा अंतर्भाव जपानी निर्गतीमध्यें व्हावयास हवा. तसेंच, जपान ठरल्याप्रमाणें हिंदी कापूस घेत आहे कीं नाहीं हेंहि काळजीपूर्वक पाहिलें पाहिजे. अलीकडे हिंदुस्थान सरकारनें जपानला ह्या देशांत पूर्वीच्या मानानें अधिक कापड पाठवण्याची तात्पुरती सवलत दिली आहे. तिला अनुलक्षून मुंबईच्या गिरणीमालक संघानें हिंदुस्थान सरकारकडे तक्रार केली असून प्रस्तुत विषयाबाबतच्या आपल्या धोरणाचा त्यांनीं खुलासा करावा असें सुचवलें आहे. जपानशीं नवा पक्का व्यापारी करार व्हावयाचा आहे ह्या गोष्टीचा फायदा घेऊन जपान आपल्या कापडाचा ह्या देशांतील खप वाढवीत आहे ह्या गोष्टीकडेहि सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील गिरणीमालक संघानेंहि कोइंबतूरहून सरकारकडे जपानच्या सुताच्या व कापडाच्या वाढत्या निर्गतीविरुद्ध तक्रार केली आहे. हिंदुस्थान सरकार या प्रश्नांत तात्काळ लक्ष घालून स्वदेशी गिरणीवाल्यांचें समाधान करील अशी आशा आहे.

---

### इंग्लिश लोकांच्या मालकीचे अमेरिकन रोखे

इंग्लंडला युद्धोपयोगी माल परदेशांतून खरेदी करून मोठ्या प्रमाणावर आणणें अगत्याचें आहे. बिगरलष्करी उत्पादनास लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंवा जनतेच्या सामान्य उपयोगाच्या मालांत कितीहि काटकसर केली तरी सरकारास बाहेरून जिन्नस आणल्यावांचून गत्यंतर नाहीं. परंतु ह्या आयातीचें देणें देण्यास पुरेशी निर्गत व्हावयास हवी असते, ती होत नाहीं. आयात-निर्गत व्यापाराचा मेळ बसावा आणि परराष्ट्रीय देणें देऊन टाकणें सुलभ व्हावें म्हणून इंग्लंडमध्यें निर्गत व्यापारास उत्तेजन देण्याचा खास प्रयत्न चाललेला आहे. तरीहि परराष्ट्रीय देणें व घेणें ह्यांमध्यें मोठी तफावत रहाते आणि ती भरून काढण्यासाठी खास उपायांची योजना करावी लागते. विशेषत: अमेरिकेंतून इंग्लंडची मालाची आयात मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि ती रोखीनेंच व्हावी लागते. "रोख पैसे द्या आणि माल घेऊन जा" असें अमेरिकेचें धोरण आहे. त्यास अनुसरून अमेरिकेवरील व्यापारी हुंड्या किंवा सोनें-चांदी उपयोगांत आणण्याची इंग्लंडला सोय नाहीं. ह्या साधनांच्या अभावीं ब्रिटिश लोकांच्या हातीं असलेले अमेरिकन रोखे उपयोगांत आणण्याचें ब्रिटिश सरकारनें योजलें असून त्याप्रमाणें व्यवस्थेस प्रारंभहि झाला आहे. ज्यांस बाजारांत मागणी आहे अशा अमेरिकन रोख्यांची एक यादी करण्यांत आली असून ते ज्यांचे जवळ असतील त्या नागरिकांनीं ते सरकारांत आणून द्यावे व त्याचा मोबदला घेऊन जावा अशी योजना प्रसिद्ध करण्यांत आली आहे. आपल्या रोख्यांची रोकड लोक घेऊन जातील ती ब्रिटिश रोख्यांत पुन्हां गुंतवली जाईल अशी अपेक्षा आहे; तथापि, ह्या बाबतींत कोणत्याचे प्रकारची सक्ती केली जाणार नाहीं. अमेरिकन रोखे म्हणजे अमेरिकेंत मिळावयाचा पैसा होय आणि त्यांचा उपयोग अमेरिकेवर काढलेल्या हुंड्यांप्रमाणेंच होऊं शकेल. परराष्ट्रीय हुंडणावळीवर सरकारी नियंत्रण असल्याकारणानें परदेशी रोख्यांचा पैसा सरकारास हवा असेल तर लोकांनीं मोबदला घेऊन तो त्यांचे स्वाधीन केला पाहिजे अशी व्यवस्था ह्यापूर्वी अमलांत होतीच. विशिष्ट अमेरिकन रोखे, त्यांची किंमत विशेष उतरणार नाहीं ह्या बेतानें, क्रमाक्रमानें विकले जावे अशी ब्रिटिश सरकारची योजना आहे आणि ती अमेरिकन रोखेबाजाराच्या दृष्टीनेंहि सोयीची आहे. प्रस्तुत योजनेस अनुसरून ब्रिटिश सरकारच्या हातीं रोखे येतील त्यांचा उपयोग अमेरिकेचें व्यापारी देणें देऊन टाकण्याकडे तें करील. पौंड स्टर्लिंग–डॉलर हुंडणावळ स्थिर राखण्यास ह्या योगानें सहाय मिळेल आणि ब्रिटन–अमेरिका व्यापार सुरळीत चालेल. अमेरिकन रोखे धारण करणाऱ्या ब्रिटिश लोकांचें ह्या व्यवस्थेनें कांहींच नुकसान व्हावयाचें नसून आपल्या सरकारास युद्ध जोरानें चालवण्यास मदत केल्याचें श्रेय मात्र त्यांस मिळेल.

---

### युद्धाच्या हालचाली

जर्मनीनें डेन्मार्क काबीज करून नॉर्वेवर स्वारी केल्या कारणानें त्याच्या सरहद्दीवर असलेल्या सर्व लहान तटस्थ राष्ट्रांत भीतीचें व अनिश्चितपणाचें वातावरण पसरलें आहे. कांहीं कारण नसतांना व डेन्मार्कचा कांहीं दोष नसतांना जर्मनीनें स्वत:च्या सोयीसाठी त्या राष्ट्राचा प्रदेश व्यापून टाकला आणि त्याचें स्वातंत्र्य नाहींसें केलें. आज डेन्मार्कवर आलेला प्रसंग उद्या आपणांवर येणार नाहीं कशावरून ही भीति जर्मनीच्या शेजारी राष्ट्रांत उत्पन्न झाली आहे. आपले हस्तक ह्या देशांत पाठवून तेथें लोकांत घरभेदेपणानें दुफळी उत्पन्न करावयाची आणि फंदफितुरीस उत्तेजन द्यावयाचें असा जर्मन सरकारचा डाव आहे. हें नॉर्वेवरच्या त्याच्या हल्ल्यावरून स्पष्ट झालें आहे. ह्या कारणानें स्वत:च्या तटस्थ वृत्तीचा भंग होऊं न देतां परराष्ट्रांचे अंतस्थ भेद निर्माण करण्याचे प्रयत्न हाणून पाडावयाचे असें बेल्जम, हॉलंड, स्वित्सर्लंड, रुमानिया इत्यादि राष्ट्रांनीं ठरवलें आहे. कोणत्याहि बाजूनें हल्ला आला किंवा आपल्या तटस्थपणाचा भंग करण्याचा प्रयत्न झाला तर त्यास तोंड देण्याची जय्यत तयारी त्यांनीं चालवली आहे. बाल्कन राष्ट्रें व तुर्कस्तान ह्या बाजूसहि साशंकपणा व अनिश्चितपणा ह्यांचेंच वातावरण आहे. इटलीचें धोरण त्यांतील वृत्तपत्रांवरून अजमावयाचें म्हटलें तर तें अत्यंत घसरडें आहे असेंच अनुमान निघतें. नॉर्वेमध्यें ऑस्लोपासून पुढें जर्मन फौजा चाल करून जात

आहेत. ब्रिटिश सैन्यें पश्चिम किनाऱ्यावर उतरून नॉर्वेजिअन फौजेच्या सहायास चालली आहेत. एका झडपेसरशी सबंध नॉर्वे आपल्या पंज्याखाली आणतां येईल ही जर्मनीची अपेक्षा फोल ठरली असून जर्मन फौजांस आतां नॉर्वेजिअन व ब्रिटिश सैन्यास तोंड द्यावें लागणार आहे. हॉलंड, बेल्जम, रुमानिया व स्वित्सर्लंड हीं राष्ट्रें जागृत होऊन स्वसंरक्षणार्थ सिद्ध आहेत ह्या गोष्टीचाहि पायबंद जर्मनीस बसला आहे. इटलीच्या धरसोडी वृत्तीचा हिटलरला फायदा मिळण्यासारखा नाहीं.

## ब्रिटिश पार्लमेंट आणि हिंदुस्थान

कॉंग्रेसच्या अधिकाराखाली असलेल्या मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिल्या कारणानें प्रांतिक विधिमंडळांस जबाबदार असलेली राज्यव्यवस्था सात हिंदी प्रांतांत बंद पडली तेव्हां त्यांचा कारभार गव्हर्नरांस स्वतःच्या हातांत घ्यावा लागला. ह्या रीतीनें सात प्रांतांत आज जबाबदार राज्यपद्धति नाहींशी होऊन वीस वर्षांमागें चालू झालेल्या राजकीय सुधारणांची पीछेहाट झाली आहे. राज्यघटनेचा १९३५ चा कायदा अमलांत आल्यानंतर हिंदी जनतेस वाढते राजकीय अधिकार प्राप्त होण्याचे आणि लोकशाहीचा विस्तार होण्याचे ऐवजीं ह्या बाबतींत देशाचें पाऊल मागें पडलें आहे. गव्हर्नरांनीं प्रांतिक कारभार आपल्या हातीं घेतला आहे, त्याची मुदत एक वर्ष वाढवण्यास पार्लमेंटनें घटना कायद्यास अनुसरून नुकतीच संमति दिली आहे. कॉंग्रेसनें केलेल्या स्वराज्याच्या अधिकाराविषयींच्या मागण्या ब्रिटिश सरकारास मान्य नाहींत. हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांनीं आपसांतील मतभेद मिटवून विशेषतः कॉंग्रेस व मुस्लिम लीग ह्यांनीं परस्परांत तडजोड करून एकमुखानें मागणी केल्यास ब्रिटिश सरकार तिचा विचार करूं शकेल आणि अशा प्रकारची तडजोड होण्यास मदतहि करील असें लॉर्ड झेटलंड ह्यांनीं लॉर्डांच्या सभेंत सांगितलें. कॉंग्रेसची स्वराज्याची मागणी अव्यवहार्य आणि अमान्य तर आहेच, पण तिला हिंदुस्थानांतील इतर पक्षांची मान्यता मिळणें अशक्य आहे अशी ब्रिटिश सरकारची भूमिका आहे. मुस्लिम लीगनें हिंदुस्थानची फाळणी करण्याची योजना पुढें मांडली आहे तीहि त्या सरकारास अयोग्य वाटत आहे, पण तिच्या योगानें ह्या देशांतील राजकीय मतभेद तीव्रतेच्या कोणत्या थरास गेले आहेत ह्याचें स्पष्ट निदर्शन झालें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांतील अंतस्थ मतभेद हेच त्यांच्या राजकीय प्रगतीच्या आड येत असून ब्रिटिश पार्लमेंट ते दूर होण्यास सहाय देण्यास केव्हांहि तयार असल्याचें लॉर्ड झेटलंड ह्यांनीं पुन्हां सांगितलें आहे. चालू युद्धांत हिटलरशाहीचा बीमोड व्हावा अशी सार्वत्रिक इच्छा असतांहि हिंदी राजकीय डाव ह्याप्रमाणें कुजत पडावा हें दुर्दैव आहे. ब्रिटिश मुत्सद्देगिरीच्या परीक्षेचा हा प्रसंग नाहीं असें कोण म्हणेल? प्रत्यक्ष इंग्लंडमध्येंच ह्या अर्थाचें मत व्यक्त करण्यांत येत आहे, ह्यांत आशेचा एक किरण आहे.

## लोकहिताच्या योजनांची अंमलबजावणी

सात हिंदी प्रांतांत जनतेस जबाबदार नाहीं अशी राज्यव्यवस्था चालू झाल्यामुळें पूर्वींच्या मंत्रिमंडळांनीं आखलेल्या लोकहिताच्या योजनांच्या अंमलबजावणीस व्यत्यय येत असल्याचें दिसून येतें. कॉंग्रेस मंत्रिमंडळें व सध्याची राजवट त्यांच्या सार्वजनिक प्रश्नांबाबतच्या धोरणाविषयींच्या दृष्टीकोनांत भेद असणें स्वाभाविक आहे. जनतेच्या पाठिंब्याच्या जोरावर त्या मंत्रिमंडळांनीं प्रगतीच्या योजना उत्साहानें आखून त्यांच्या पूर्तीस प्रारंभहि केला. ह्यांपैकीं कित्येक योजना खर्चाच्या असून त्यांची यशस्वितता लौकिक शिक्षण व संघटन ह्यांच्यावर अवलंबून राहणें अपरिहार्यच होतें. जबाबदार मंत्र्यांस कित्येक गोष्टी धडाडीनें हातीं घेतां येतात आणि प्रसंगीं कांहीं वर्गांचा विरोधहि सहन करून पुढचा मार्ग काढतां येतो. जनतेचें प्रतिनिधित्व राज्यकारभारांत नाहींसें झालें म्हणजे सरकारास बेतानेंच पुढें पाऊल टाकावें लागतें, खर्चाच्या बाबींस कात्री लावावी लागते आणि आर्थिक सुधारणांची गति मंद करावी लागते. ह्या परिस्थितीचें मुंबई प्रांतासंबंधानें ताजें उदाहरण म्हणजे जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डांच्या परिस्थितीचें देतां येईल. ग्रामसुधारणा व ग्रामसंघटन ह्या विषयींच्या योजना करून त्या सरकारच्या द्रव्यसहाय्यानें अंमलांत आणण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत रूरल डेव्हलपमेंट बोर्डांची स्थापना कॉंग्रेस मंत्रिमंडळानें केली होती आणि त्यांचें एकीकरण प्रांतिक बोर्डाच्या द्वारें केलें होतें. परंतु ह्या बोर्डांच्या कार्यास प्रारंभ होतो न होतो तोंच कॉंग्रेस मंत्रिमंडळानें राजीनामा दिला. त्या मंत्रिमंडळाचें धोरण नव्या राजवटींत चालू राहतें कीं नाहीं ह्याची शंका जिल्हा बोर्डांच्या सभासदांच्या मनांत उत्पन्न होऊन कांहीं बाबतींत मतभेदहि निर्माण झाले. ठाणा व बॉंबे सबर्बन डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट बोर्डानें प्रस्तुत प्रकरणीं सरकाराकडे विचारणा करून आपलें धोरण स्पष्ट करण्याची विनंति केली. आपल्या कार्यास लागणाऱ्या खर्चास सरकारची मंजुरी अजून मिळाली नसल्यानें आपलें कार्य अडून पडलें आहे आणि रेव्हेन्यू खात्याचा संबंध ग्रामसुधारणेच्या खात्याशीं नवीन जोडून दिला गेल्यामुळें त्यांत व्यत्यय येण्याची भीति आहे असें वरील बोर्डानें सरकारास कळवलें. मुंबई सरकारनें ह्या तक्रारीबद्दल आपलें म्हणणें काय आहे, हें स्पष्ट करणारा खुलासा आतां प्रसिद्ध केला आहे.

## ब्रिटिश कापडावरील जकात कमी झाली

ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान सरकार ह्यांचे मध्यें व्यापारी करार झाला आहे, त्यांत ब्रिटिश कपास—कापडाच्या आयातीवर जकात किती व कशी आकारली जावी ह्या संबंधांत तरतूद केलेली आहे. त्यांत कोणत्याहि सालीं ब्रिटिश कापडाची आयात ३५ कोटि वारांपेक्षा अधिक झाली नाहीं तर ही आयात पुढच्या कोणत्याहि सालांत ४२½ कोटि वारांच्यावर जाईपर्यंत सदरहु मालावरची आयात २½ टक्क्यांनीं कमी केली जावी अशी ती व्यवस्था आहे. एप्रिल १९३९ ते मार्च १९४० ह्या बारा महिन्यांत ब्रिटिश कापडाची ह्या देशांत झालेली आयात ३५ कोटि वारांच्या मर्यादे पलीकडे गेली नाहीं, ह्या कारणानें हिंदुस्थान सरकारनें वर निर्दिष्ट केलेल्या व्यापारी करारांतील तरतुदी- प्रमाणें विशिष्ट जातींच्या ब्रिटिश कापडावरील जकात कमी केली आहे. मध्यवर्ती सरकारच्या खास गॅझेटामध्यें ज्यांचे बाबतींत जकात कमी व्हावयाची आहे त्या कापसाच्या जातींचा व जकातीच्या दरांचा तपशील दिला आहे.

## इजिप्तमधील शेतकऱ्यांचें कर्जनिवारण

दि नॅशनल बँक ऑफ इजिप्त ह्या बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिच्या अध्यक्षांनीं केलेल्या भाषणांतील कांहीं उद्गार हिंदुस्थानांत बोधप्रद होण्यासारखे असल्यानें त्यांचा गोषवारा आम्हीं येथें देत आहों. दि नॅशनल बँक ऑफ इजिप्तचे अध्यक्ष, सर एडवर्ड कुक, इजिप्तमधील शेतकरी वर्गाच्या भांडवलाविषयींच्या गरजा आणि त्यांचीं कर्जें यांचे संबंधांत म्हणालेः—

" पहिला प्रश्न शेतीस लागणाऱ्या कर्जाऊ भांडवलाविषयींचा आहे. बहुसंख्य इजिप्शन शेतकऱ्यांजवळ त्यांच्या शेतीच्या व्यवसायास आवश्यक असलेला पैसा असत नाहीं आणि तो हंगामापुरता त्यांस कर्जाऊ घ्यावा लागतो. कांहीं शेतकऱ्यांस नवीन जमिनी नांगराखालीं आणण्याकरितां लांब मुदतीच्या पैशाची जरूर भासते. त्यांचे कर्ज मिळविण्याचे मार्ग अनेक असून कित्येक वेळां वाजवीपेक्षा अधिक सोप्या रीतीनें त्यांस पैसा मिळतो. तथापि, अलीकडे कर्जें इतक्या सहज रीतीनें मिळत नाहींशी झालीं आहेत, आणि त्याचें मुख्य कारण युरोपांतील युद्ध हें आहे. कर्जें देणारांनीं युद्धपरिस्थितीमुळें आपला हात आखडलेला आहे.

"तथापि, त्यापेक्षा महत्त्वाचें एक कारण शेतकऱ्यांस कर्जें मिळण्यास पडणाऱ्या अडचणींच्या मुळाशी आहे. १९१४–१८ च्या दरम्यानच्या महायुद्धामुळें शेतीच्या मालाचे भाव विलक्षण चढले होते आणि ती चलती दहा वर्षें टिकून भयंकर आर्थिक मंदी तिचे ठिकाणीं आली. कित्येक इतर देशांप्रमाणें इजिप्तमधील सरकारास ह्या मंदीवर उपाययोजना करण्यासाठीं धनको व ऋणको ह्यांच्या व्यवहारांत पडून शेतकऱ्यांचीं कर्जें कमी होण्याची व्यवस्था करावी लागली. ऋणकोंची बाजू सरकारनें घेण्यांत धोका असतो. त्यांत ऋणकोंस सहाय मिळतें खरें, पण त्याचा दुष्परिणाम उघड दिसला नाहीं तरी तो निश्चित झाल्यावांचून रहात नाहीं. नऊ वर्षांमागें मंदीची भयंकर आपत्ति आली तेव्हां शेतकऱ्यांचा धंदा वाचवण्यासाठी सरकारास मध्यें पडण्यावांचून गत्यंतर नव्हतें. धनको–ऋणकोंच्या परस्पर संबंधांत ढवळाढवळ करणें सरकारास अपरिहार्य झाल्यास त्यानें उपाययोजना तात्काळ करावी आणि लागलीच स्वतः बाजूस सरावें. इजिप्तमध्यें या संबंधांत चुका झाल्या नाहींत, असें म्हणतां येत नाहीं. मोठाल्या जमीनदारांचा प्रश्न सोडवणें सोपें गेल. लहान कर्जदार आणि विशेषतः जमीन गहाणाचीं प्रकरणें यांचा निकाल लागण्यास बराच कालावधि झाला. सावकारांस आपल्या कर्जांच्या वसुलीसाठी फिर्यादी लावण्याची कायद्यानें बंदी केली आणि ह्या बंदीची मुदत वेळोवेळ वाढवण्यांत आली. ह्या मुदतवाढीचे परिणाम अनिष्ट झाले आहेत. फिर्याद बंदीची एकदा सवय लागली कीं ती नाहींशी होत नाहीं. धनको-ऋणकोंच्या संबंधांत सरकारनें हस्तक्षेप करणें दहा वर्षांमागें समर्थनीय असलें तरी त्याची इष्टता वर्षानुवर्ष टिकत नाहीं. शेतकऱ्यांस पैसा पुरवणाऱ्या व्यक्तीस व संस्थांस सरकारी धोरणामुळें स्थैर्य व निश्चिती लाभत नाहीं आणि सर्व धनको आपले व्यवहार मर्यादित करतात. इजिप्तमध्यें ह्या कारणानें शेतकऱ्यांस आपल्या धंद्यास जरूर असलेला पैसा मिळणें कठिण झालें आहे. कर्जवसुलीच्या बंदीचा अनिष्ट परिणाम काय होतो, ह्याचा अनुभव इजिप्तला आला आहे. "

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१३,००,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रि ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः—टी. आर. लालवाणी.

---

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ........रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ........रु. | ३,१२,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ...रु. | १,५६,००० |

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

## ग्रामसुधारणेचा प्रांतिक प्रयत्न

काँग्रेसचें प्रधानमंडळ ह्या प्रांतांत अधिकारारूढ होतें, त्या वेळीं त्यानें ग्रामसुधारणेचा व्यापक कार्यक्रम आखला होता आणि त्यास अनुसरून योजनाहि हातीं घेतल्या होत्या. त्या प्रधानमंडळानें अधिकारत्याग केला आणि प्रांतिक गव्हर्नरांनीं सर्व राज्यकारभाराची जबाबदारी स्वतःकडे घेतली, तेव्हां तो कार्यक्रम चालू रहातो किंवा त्यांत खंड पडतो ह्याविषयीं जनतेमध्यें साशंक कुतूहल उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. पूर्वीच्या प्रधानमंडळाचें धोरण होईल तोंपर्यंत आपण चालू ठेवूं असें अभिवचन नवीन सरकारच्या वतीनें देण्यांत आलें होतें. तथापि, काँग्रेस प्रधानमंडळाच्या कार्यक्रमाची छाननी करून त्यांत थोडा-फार बदल आपल्या बुद्धीप्रमाणें करण्याची आणि अपेक्षित प्रगतीची गति कित्येक बाबतींत कमी करण्याची प्रवृत्ती गव्हर्नरांच्या सल्लागार अधिकाऱ्यांमध्यें दिसून येणें हेंहि साहजिक होतें. मुंबई सरकारानें ह्यासंबंधांत खुलासा प्रसिद्ध करून ग्रामोद्धाराच्या योजनेबाबत आपलें धोरण काय आहे हें जनतेस कळवलें आहे.

काँग्रेस प्रधानमंडळाच्या योजनांच्या अंमलबजावणीस प्रारंभ होण्यापूर्वी विशिष्ट प्रकारची पूर्वतयारी अपरिहार्यच होती आणि ती त्या मंडळाच्या अमदानींत न होऊं शकल्यामुळें तिची जबाबदारी गव्हर्नरांचेवर येऊन पडली आहे. ग्रामोद्धाराचें कार्य दीर्घपरिणामकारक व्हावयाचें असेल तर तें घाईनें करून उपयोगी नाहीं, त्याचा पाया बळकट घातला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. काँग्रेस प्रधानमंडळाची अत्यंत महत्त्वाची योजना शेतकऱ्यांच्या ऋणमुक्ततेसंबंधांतली आहे. तिची अंमलबजावणी आणि यशस्विता ज्या अनेक गोष्टींवर अवलंबून आहे त्यांत शेतीच्या मालाच्या विक्रीच्या संस्थांची स्थापना महत्त्वाची आहे. आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, स्थानिक परिस्थिति, भांडवलाचा पुरवठा, देखरेखीची तजवीज इत्यादि बाबतींत चांगली तयारी झाल्यावांचून अशा सहकारी संस्था चालू केल्या असतां प्रगति होण्याच्या ऐवजी पिछेहाटच होण्याचा पुष्कळ संभव असतो. ही गोष्ट लक्षांत घेऊन मुंबईच्या सध्याच्या सरकारानें सावधगिरीनें पुढें पाऊल टाकण्याचें ठरवलें आहे आणि ग्रामसुधारणेच्या योजनेची पूर्वतयारी हातीं घेण्याचा कार्यक्रम आखला आहे.

आपला माल फायदेशीर रीतीनें विकण्याचे कामीं शेतकऱ्यांस अडचण भासते, ती दूर होण्याकरितां काँग्रेस प्रधानमंडळानें नियंत्रित बाजारांविषयींचा कायदा केला आहे. त्याची अंमलबजावणी होण्यास नियम तयार करणें आवश्यक आहे. ह्या नियमांचा मसुदा मालविक्री अधिकाऱ्यांनीं सरकारास सादर केला असून सध्या त्याचा विचार चालू आहे. नियंत्रित बाजारांची स्थापना जिल्हानिहाय व्हावी लागेल आणि त्याकरितां वरिष्ठ इन्स्पेक्टिंग अधिकाऱ्यांची नेमणूक व्हावयाची आहे. त्यांची निवड करण्याचें काम पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे सोपवण्यांत आलें आहे. शेतकीच्या पुढच्या हंगामाचे सुमारास बऱ्याच ठिकाणीं नियंत्रित बाजारांची संघटना होऊन त्यांचा फायदा प्रांताच्या प्रमुख पिकांचे बाबतींत शेतकऱ्यांस मिळूं लागेल अशी सरकारची अपेक्षा आहे. सहकारी पद्धतीच्या मालविक्रीच्या संस्था स्थापन करण्याचा मुख्य उद्देश असून त्यांची व्यवस्था पहाण्यासाठीं नेमावयाच्या नोकरवर्गाच्या खर्चाकरितां चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ४९,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था करण्याची एक योजना मागें आखण्यांत आली होती आणि तिला इंपीरिअल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चचें द्रव्यसहाय्य पांच वर्षेपर्यंत मिळालें. ही मदत बंद व्हावयाची होती, पण आणखी पांच वर्षे ती चालू रहाणार असून प्रांतांतल्या सर्व मुख्य पिकांची विक्रीच्या दृष्टीनें पहाणी पुरी करण्याचें ठरलें आहे. मुंबई सरकारच्या बजेटांत त्या कामाप्रीत्यर्थ २८,००० रुपयांची तजवीज करण्यांत आली आहे.

शेतकरी वर्गाच्या ऋणमुक्ततेचा प्रश्न आणि त्याविषयीं मुंबई विधिमंडळानें केलेला कायदा हीं येथें अत्यंत महत्त्वाचीं आहेत, हें वर सांगितलेंच आहे. शेतकऱ्यांच्या कर्जांच्या बाबतींत त्यांचा निकाल करण्यासाठीं नेमल्या जाणाऱ्या बोर्डाकडे ऋणकोनें अथवा धनकोनें अर्ज करावयाचा आहे. कर्जाचें मुद्दल व त्यावरील व्याज ह्यांची बेरीज मूळ रकमेपेक्षां दुप्पट असणार नाहीं ह्या बेतानें ती ठरविली जाईल आणि ऋणकोच्या जिंदगीच्या ८० टक्क्यांवर ती उतरवण्यांत येऊन तिच्या परतफेडीची व्यवस्था निश्चित केली जाईल. ह्या प्रांतांतील शेतकऱ्यांचें कर्ज सुमारें ७० कोटि रुपये आहे आणि त्याची तडजोड व्हावयाची म्हणजे मोठें प्रचंड काम आहे, ह्यांत संशय नाहीं. ऋणमुक्ततेच्या कायद्याअन्वयें व्हावयाचे नियम फार काळजीनें तयार करावे लागतील हें उघड आहे. ह्या नियमांच्या मसुद्याचा विचार सरकार करीत आहे आणि कर्जाचे निवाडे करणारीं शेकडों बोर्डस नेमावीं लागतील, त्यांचाहि विचार चाललेला आहे.

शेतकऱ्यांस, विशेषतः प्रांताच्या मागासलेल्या भागांत, धान्याच्या स्वरूपांत कर्जे देण्याची व ती धान्याच्याच स्वरूपांत वसूल करण्याची व्यवस्था करण्याचें सरकारनें ठरवलें असून त्यासाठीं सुमारें सवा लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. सावकार लोक ह्या रीतीनें कर्जे शेतकऱ्यांस देतात आणि कर्जाऊ दिलेल्या धान्याच्या दीडपट धान्य हंगामांत त्यांचेकडून वसूल करतात. कर्ज घेते वेळीं धान्य महाग असलें आणि परत फेडीचे वेळीं त्याचे भाव उतरले तरी आपण पिकवलेल्या मालाचा कांहीं अंश शेतकऱ्यांस वाचवतां आला तर तें निःसंशय फायदेशीरच होईल. मागसलेल्या भागांत स्थानिक शेतकरी व खेडेगांवचे सरकारी नोकर ह्यांच्या देखरेखेखालीं धान्यांत कर्ज देण्याची पद्धति कांहीं ठिकाणीं रूढ आहे. तीच पद्धतशीर रीतीनें चालवण्याचा सरकारचा विचार आहे. दिलेल्या धान्याच्या सवा पटीनें धान्य वसूल केलें जाईल. व्यवस्थेच्या खर्चासाठीं ह्या फरकाचा कांहीं भाग उपयोगांत आणला जाईल आणि उरलेलें धान्य अधिक लोकांना कर्जे देण्याकडे लावतां येईल अशीहि योजना आहे.

---

### “ हिमालय ”

औंध संस्थानचे राजे, श्रीमंत बाळासाहेब, यांनीं पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यांत ता. २-४-४० रोजीं 'हिमालय' या विषयावर व्याख्यान दिलें व त्यांनीं स्वतः प्रवासांत असतांना तयार केलेला चित्रपट दाखविला. त्यांनीं हिमालयाचें महत्त्व सांगून भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र, सृष्टिसौंदर्य, रसायनसंशोधन, आयुर्वेदवनस्पति, जलौघ व विद्युत्‌शक्तीच्या निर्मितीची शक्यता वगैरे दृष्टीनें या प्रवासाचें वर्णन केलें व प्रत्येकानें आपल्या आयुष्यांत एकदा तरी हिमालय पर्वत अवश्य पहावा असें सांगितलें. यानंतर तीन रंगांचा चलत्-चित्रपट सुमारें दीड तास दाखविण्यांत आला. चित्रपट चालू असतांना राजेसाहेबांनीं स्थळांच्या आठवणी व स्थळांचें माहात्म्य यासंबंधीं माहिती सांगितली. श्री. पोपटलाल शहा यांनीं कार्यक्रमानंतर श्रीमंतांचे मनःपूर्वक आभार मानिले.

### " न्यायबोध "

" न्यायबोध " या मासिकाचा एप्रिलचा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत नेहमीप्रमाणें हिंदी हायकोर्टीचे महत्त्वाचे निर्णय उद्धृत केले असून कायद्याच्या अनेक प्रश्नांची चर्चा आली आहे. कायद्याच्या भानगडी न समजणाऱ्या सामान्य जनतेस " न्यायबोधां"त दिलेली माहिती उपयुक्त झाल्यावांचून रहाणार नाहीं. व्यापाऱ्यांच्या व इतर धंदेवाल्यांचे दृष्टीनेंहि ही माहिती बोधप्रद आहे. उदाहरणार्थ, "दुकानची खातेबाकी वसूल होण्यासाठीं दावा व त्यांत उद्भवलेला मुदतीचा महत्त्वाचा प्रश्न" ह्या मथळ्याखालीं देण्यांत आलेला मुंबई हायकोर्टाच्या निवाड्याचा वृत्तांत दुकानदारांस व सामान्य व्यापारीवर्गास मार्गदर्शक होईल.

---

### जाहिरातींवरील खर्च

अमेरिकेंत जाहिरातींवर खर्च होतो, त्याचें एकूण होणाऱ्या मालाच्या विक्रीशीं प्रमाण २% इतकें पडतें.

### ग्रंथमुद्रण व ग्रंथप्रकाशन

पुस्तकें छापणें व प्रकाशित करणें ह्या धंद्यांत येणाऱ्या अडचणी दूर होऊन त्याची प्रगति व्हावी ह्या हेतूनें त्या संबंधांत एक प्रदर्शन मुंबईंत येत्या डिसेंबरांत भरावयाचें आहे. ग्रंथकारांच्या हस्तलिखितांपासून वाचकांच्या पुस्तकांच्या कपाटांपर्यंत ह्या धंद्याचीं विविध अंगें डोळ्यांत भरतील अशी व्यवस्था प्रदर्शनांत करण्यांत यावयाची आहे.

### वृत्तपत्रांच्या कागदाची किंमत इंग्लंडमध्यें वाढली

वृत्तपत्रांसाठीं वापरण्यांत येणाऱ्या ब्रिटिश कागदाची किंमत नियंत्रक अधिकाऱ्यांनीं गेल्या १ एप्रिलपासून दर टनामागें सुमारें ६० रुपयांनीं वाढवली आहे. युद्धाच्या आरंभाचे वेळीं ह्या कागदाची किंमत दर टनास १४५ रुपये होती, ती हळुहळु वाढून आतां सुमारें २८८ रुपये झाली आहे.

### बाटानगर

कलकत्त्याचे जवळ जगप्रसिद्ध बाटानें बुटांचा मोठा कारखाना स्थापला आहे, त्यांत चार हजार लोक कामावर आहेत. कारखान्याच्या रबर-विभागांत गेल्या वर्षी एक कोटि पादत्राणांच्या जोड्या तयार झाल्या. चामड्याच्या विभागांत तयार झालेल्या जोड्यांची संख्या पंधरा लक्ष होती.

---




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७१ सदाशिव, पुणें.

---

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें

## मेहेकर को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., मेहेकर

( लि. आ. म. )

को.ऑ.लँड मॉर्गेज बँक लि. ही संस्था मेहेकर येथें पहिल्या प्रथम सन १९३३ मध्यें वऱ्हाड-मध्यप्रांतांतील पहिली मॉर्गेज बँक म्हणून प्रयोगादाखल स्थापन झाली. सुरवातीस तिचें कार्यक्षेत्र मेहेकर तालुक्यापुरतेंच मर्यादित होतें. पुढें १९३५ सालीं चिखली तालुकाही तिच्या कार्यक्षेत्राखाली आणण्यांत आला.

संस्थेचें ता. ३०-६-३९ रोजीं शेअर्सच्या रूपानें वसूल झालेलें भांडवल रु. ६७४० होतें. ही बँक लांबमुदतीनें कर्ज देणारी असल्यामुळें ठेवी स्वीकारण्यांत येत नाहींत. बँकेस लागणारी रक्कम प्रांतिक बँक लागेल त्या प्रमाणांत देते व त्याबद्दल प्रां. बँकेस प्रां. सरकारनें व्याजाची व मुद्दलाची हमी दिलेली आहे.

आजपर्यंत बँकेकडे ४३० कर्जमागणीचे अर्ज ५½ लक्ष रुपये कर्जाकरितां आले असून बँकेनें १२८ लोकांना १½ लक्ष रुपये कर्ज दिलेलें आहे. वरील दीड लक्ष रुपयांत बँकेचे जवळ ८४२० रु. शेतसाऱ्याची ८६७७ एकर जमीन गहाण आहे. बँक सभासदांस शेकडा ६½% दरानें व २० वर्षांच्या हप्तेबंदीनें कर्ज देते. सदर्हू हप्ते सारख्या रकमेचे पाडण्यांत आलेले आहेत. या बँकेंत कर्जदारावर सहकारी पतपेढ्यांप्रमाणें अमर्याद अगर समाईक जबाबदारी नसून ज्याचा तो आपले देण्याघेण्याबद्दल जबाबदार आहे.

ही बँक जुनें कर्ज फेडण्यासाठी कर्ज देते. बँकेच्या सभासदांच्या चालू खर्चाच्या सोईसाठी म्हणून सभासदांच्या दोन स्वतंत्र पतपेढ्या, एक चिखली तालुक्याकरितां व एक मेहेकर तालुक्याकरितां, स्थापन केल्या आहेत. सध्या प्रत्येक सभासदास दर १०० रु. कर्जास दरवर्षी रु. ९-१-३ प्रमाणें २० वर्षेपर्यंत हप्ता द्यावा लागतो; व याप्रमाणें २० वर्षे हप्ते दिले असतां व्याज व मुद्दल सर्व फिटतें. याचा अर्थ व्यापारी भाषेंत बोलावयाचें म्हणजे असा होईल कीं, कर्जदारानें द. द. शे. ९% प्रमाणें कर्ज काढलें असतां व दरसाल नेमानें ९ रु. दिले असतां, इतर सावकारांचे २० वर्षांनंतर मुद्दल कर्ज कायम राहील; परंतु या बँकेंत वरीलप्रमाणें दरसाल ९-१-३ हप्ता दिला असतां २० वर्षांत सर्व रक्कम व्याज मुद्दल फिटून तो निष्कर्जी (कर्जमुक्त) होईल. यावरून या बँकेशी व्यवहार करण्यांत शेतकऱ्यांस किती फायदा आहे हें लक्षांत येईल.

बँकेचे भागिदारांत कर्ज घेणारे व बिनकर्ज घेणारे असे दोन प्रकार आहेत. कर्ज घेणाऱ्या भागीदारास कर्जाचे दर २५० रु.स एक भाग ५ रु. चा याप्रमाणें भाग घ्यावे लागतात. सदर्हू भागांची रक्कम ही ज्या तारखेस तो आपलें खातें चुकतें करूं इच्छितो त्या तारखेस त्यास नगदी अगर हिशेबांत मजरा देण्यांत येते. कर्जफेडीचा ठराव २० वर्षांचा असला तरी देखील कर्जदारानें वाटेल तेव्हां पूर्ण भरपाई केल्यास रक्कम फडमितीच्या व्याजानें घेतली जाते. गहाण मिळकतीपैकी कांहीं भाग विकून कर्ज फेड करावयाची असल्यास विकलेल्या इस्टेटीची पूर्ण किंमत बँकेस कर्जदार देण्यास तयार असल्यास बँक त्यास खुषीनें परवानगी देते. या बँकेचे व्यवहारांत व्यापारी वृत्ति किंवा अडवणुकीची भावना नसून सर्व व्यवहार अत्यंत सरळ असा आहे.

बँकेंत कर्ज १५० रु. पासून २५,००० पर्यंत देण्यांत येतें; परंतु गेल्या वर्षापासून सदर्हू कर्जमर्यादा तूर्त रु. १००० वर आणण्यांत आली आहे. कारण बँकांचे हप्ते बऱ्याच बँकांमधून थकित झाले आहेत. अर्ज दिल्यापासून कर्ज हातीं येईपर्यंत बराच कालावधी लागतो, त्यामुळें अर्जदारांची कुचंबणा होते. ही अडचण कशी दूर करतां येईल याचा विचार चालू आहे.

या बँकेंत एक मॅनेजर, एक कारकून व शिपाई असे तीन नोकर असून त्यांचा मासिक पगार रु. ८२ आहे. याशिवाय इतर किरकोळ खर्चही आहेत. बँकेची कोणतीही सभा कोरम अभावीं स्थगित (Adjourn) झाली नाहीं. सरकारनें प्रत्येक बँकेस व्हॅल्युअर नांवाचा एक अधिकारी जमिनी तपासण्यासाठी व अर्जांची चौकशी करण्यासाठी दिलेला आहे. कारण प्रां. बँकेस ह्यांचे कर्जाबद्दल सरकारनें हमी दिलेली आहे.

सदर्हू बँक ही वऱ्हाडांतील पहिली व प्रायोगिक बँक असल्यामुळें सरकारनें ती आपल्या पायावर उभी राहीपर्यंत तिजला आर्थिक मदत करणें हें त्यांचें कर्तव्य होतें. परंतु बँकेनें प्राथमिक खर्चाकरितां मागणी करूनहि, सरकारनें आजपर्यंत कोणतीही आर्थिक मदत दिली नाहीं. पहिलीं तीन वर्षे पावेतों म्हणजे बँकेचा जम बसेपर्यंत बँकेस झालेली पैदास प्राथमिक खर्चांत गेली. हा सर्व खर्च वजा जातां आज ता. ३०-६-३९ रोजीं पर्यंत एकूण रु. ३२५७-१२-११ इतका निव्वळ नफा झालेला आहे. बँकेचें आजपर्यंत जमलेलें भांडवल व निव्वळ नफा यांचें प्रमाण पाहतां निम्मे भांडवल जवळ जवळ वसूल झालेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बँकेचे प्रथम पासूनचे अध्यक्ष श्री. रा. दादासाहेब सोमण हे असून श्री. वि. ग. कविमंडन हे सेक्रेटरी आहेत. कायदेशीर सल्ल्याचें काम श्री. रा. जी. एस. दीक्षित वकील करतात. आजपर्यंत बँकेचा सर्व कारभार डायरेक्टरांचे मतैक्यानें चाललेला आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. तसेंच से. को. बँक, मेहेकर या संस्थेनें आपल्या इमारतींत सदर्हू बँकेस ऑफीसकरितां विनामूल्य जागा दिलेली आहे हेंही नमूद करणें अवश्य आहे.

---

## राष्ट्रसंघाचें कार्य

युद्धाचें क्षेत्र वाढत असल्याकारणानें राष्ट्रसंघाची माहिती गोळा करण्याचें काम अत्यंत अवघड झालें आहे ह्यांत शंका नाहीं; तरीहि संघाचा कार्यक्रम चालू आहे व त्याच्या दिल्ली येथील कचेरीकडून उपयुक्त माहिती पुरवण्यांत येत आहे. राष्ट्रसंघाच्या व्यापारी मासिकाच्या मार्च अंकांत खालील माहिती आढळते:—

"औद्योगिक उत्पादन गेले ४ महिने वाढत्या प्रमाणांत आहे. हें वाढीचें प्रमाण ग्रेटब्रिटन २३, कॅनडा व नॉर्वे ११, स्वीडन १०, डेमार्क व बेल्जम ६, इस्तोनिआ २ व बल्गेरिआ १ टक्का याप्रमाणें आहे. लाटव्हियांत १० व चिलींत २ टक्के कमी उत्पादन झालें. अमेरिकेचा व्यापार १९२९ अखेर वाढता होता, पण अलीकडचे आकडे समाधानकारक नाहींत."

---

## सहा महिन्यांत पांच कोटि पत्रें

फ्रान्समध्ये आघाडीवर असलेल्या ब्रिटिश सैनिकांच्या सुखसोयींकडे किती लक्ष देण्यांत येतें हें त्यांनीं घरीं पाठवलेल्या आणि घरांकडून त्यांस आलेल्या पत्रांच्या ब्रिटिश पोस्टाच्या व्यवस्थेवरून दिसून येतें. ह्या पत्रांची संख्या सहा महिन्यांत पांच कोटि भरली.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११३–१० |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०३–८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६–० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४–५ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३–१० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०५–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०४–८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१–० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३९–० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२–० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६–१० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५१७–८ |
| पांचि मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३–० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५–४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १३३–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९५–० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२–८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४५–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५२५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५–८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८६–४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६५–० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २२१–० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७–१२ |
| शिंदा स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३८०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४८–४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९७–८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. १ पै ... | २१८५–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १२–२–४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–७–९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५८–२–६ |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.
हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५
आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांची तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर.



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचें नादीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होणें, मुलें, शोष्यास ताठ न होणें, इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्ये असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज ( डि. नं. १ )
२५११३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व धनंजय वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.